एकीकडे हे मध्य प्रदेशात जात तर दुसरीकडे खाली आंध्र प्रदेशापर्यंत जात. खरिजा जातीचे लोक रामगढ, विलासपूर आणि सरगुजाच्या आजूबाजूस तलाव, छोटे बंधारे आणि कालवे यांचे काम करीत. १९७१ च्या जनगणनेप्रमाणे त्यांची संख्या २३००० इतकी होती.

बिहारमधील मुसहर, बिहारला लागून असलेल्या उत्तर प्रदेशच्या भागातील लुनिया, मध्यप्रदेशमध्ये नौनिया, दुसाध आणि कोल जातींचे लोकसुद्धा तलाव बनविण्यात व्यस्त असत. मुसहर, लुनिया आणि नौनिया आजच्यासारखे तेव्हा लाचार नव्हते. अठराव्या शतकापर्यंत तलाव बांधल्यानंतर मुसहरांना पारिश्रमिकाच्या समवेत जमीनसुद्धा दिली जात असे. नौनिया व लुनियांची तर तलाव पूर्ण झाल्यानंतर पूजा होत असे. मातीचे जाणकार मुसहरांचे समाजात एक वेगळेच स्थान होते. कोणे एके काळी चोहरमल त्यांचे शक्तिशाली नेता होते.

श्री शैलेश हे दुसाध लोकांना पूज्य होते. त्यांचे गीत ठिकठिकाणी गायले जात असे आणि इतर लोकसुद्धा त्यांना आदर देत. दुसाध जेव्हा श्री शैलेशचा यज्ञ करतात तेव्हा अन्य जातींचे लोकसुद्धा त्यात भाग घेतात. याच भागात डांढी नावाच्या लोकांची वस्ती होती. कठीण आणि मेहनतीचे काम करण्यासाठी हे लोक प्रसिद्ध होते. बिहारमध्ये आजही एखाद्या कठीण कामाचे योग्य उत्तर सुचले नाही तर म्हणतात 'डांढी लगा दो.' डांढी ही अतिशय सुंदर व मजबूत अंगकाठी असणारी जमात होती. या जातीच्या लोकांचे सुडौल व पीळदार शरीर बघतच राहावे असे होते.

बिहार व बंगालमध्ये वस्तीस असलेले संथाल लोकही सुंदर तलावनिर्मिती करीत. संथाल प्रांतातील सर्व काही नष्ट झाले तरी अनेक तलाव मात्र संथालांच्या कुशलतेची आठवण देत आजही उभे आहेत. महाराष्ट्रातील नाशिक क्षेत्रात कोहलियांच्या हस्ते इतके बंधारे व तलाव बांधण्यात आले होते की, या भागावर दुष्काळाची छाया कधीच येत नसे. समुद्राच्या किनारी असलेले गोवा आणि कोकण प्रदेश घनघोर वर्षा होणारे क्षेत्र आहेत. परंतु पावसाचे गोड पाणी बघता बघता विशाल समुद्राच्या खाऱ्या पाण्यात मिसळून जाते.

पश्चिम घाटाच्या पहाडात वरून खालपर्यंत अनेक तलावांत पावसाचे पाणी वर्षभर अडवून ठेवणे हे गावडी जातीचे कौशल्य होते. इथे, तसेच याच भागाला जोडून असणाऱ्या उत्तर कर्नाटकात चिरे नावाचा दगड सापडतो. मुसळधार पाऊस आणि पाण्याच्या लोंढ्याला याच दगडाच्या आधारे ते जखडून टाकीत असत. चिरे दगड खाणीतून काढून एका ठराविक आकारात तासून घेत असत आणि आजही घेतात. त्या आकारात तीळमात्र फरक झालेला नाही.

इतके व्यवस्थित काम व्यवस्थित साच्याशिवाय होणे शक्य नव्हते. बुद्धी आणि संघटितपणा यांचा सुंदर मिलाप केला म्हणून तर देशात इतक्या मोठ्या संख्येने तलाव निर्माण झाले आणि ते वर्षानुवर्षे टिकलेही. त्यांचे संघटन कौशल्य किती सुंदर व मजबूत असेल? या प्रश्नाचे उत्तर दक्षिणेतील एका उदाहरणावरून मिळते.

सिंचनाकरिता उपयोगी तलावांना दक्षिणेत एरी म्हणतात. गावागावांत एरी होती आणि दोनशे वर्षांच्या उपेक्षेच्या काळानंतर आजही हजारो एरी कार्यरत आहेत. गावात पंचायतीच्या अंतर्गत आणखी एक संस्था असे. एरी वार्यम. एरी वार्यममध्ये गावातील सहा सदस्यांची एका वर्षासाठी नियुक्ती केली जात असे. एरीसंबंधी प्रत्येक काम - एरी बांधणे, एरीची देखभाल व दुरुस्ती, सिंचनाची योग्य व निःपक्षपाती व्यवस्था आणि या सर्व कामासाठी साहित्य सतत गोळा करणे ही वार्यमची जबाबदारी असे. वार्यमचे सहा सदस्य हे काम व्यवस्थित करू शकले नाहीत तर वेळेपूर्वीच त्यांना बाजूला करीत.


या भागात एरी बनविण्याचे काम बोद्दार लोक करीत. सिंचनाच्या व्यवस्थेकरिता एक पद असे. वेगवेगळ्या भागांत या पदाची नीरघंटी, नीरगंटी, नीरआनी, कंबककट्टी माइयन थोट्टी अशी वेगवेगळी नावे होती. तलावात पाण्याचा साठा किती आहे, किती क्षेत्रात सिंचन करावयाचे आहे, पाण्याचे वाटप कसे करावयाचे आहे - ही सारी कामे नीरघंटी करीत. बऱ्याच भागांत नीरघंटी या पदावर फक्त हरिजनाचीच नेमणूक होत असे आणि सिंचनाच्या बाबतीत त्याचा निर्णय अंतिम मानला जाई. शेतकरी कितीही मोठा असला तरी या बाबतीत मात्र नीरघंटीपेक्षा छोटाच मानला जात असे.

एकीकडे दक्षिणेत नीरघंटीसारखे हरिजन होते तर पश्चिमेत पालीवालसारखे ब्राह्मण होते. जैसलमेर, जोधपूरजवळील पल्लीनगर येथे दहाव्या शतकात हे वस्ती करून राहत असल्यामुळे त्यांना पल्लीवाल किंवा पालीवाल असे संबोधन पडले. मरुभूमीत पडणाऱ्या अत्यंत कमी पावसाच्या पाण्यास अडविण्याचे कौशल्य पालीवालांना ज्ञात होते. ते खडीनचे उत्तम निर्माते होते. वाळवंटात पडणाऱ्या थोड्याशा पावसाचे पाणी जिथे वाहत येते, त्या ठिकाणी दोन किंवा तीन बाजूंनी बांध घालून अडवून तयार केलेल्या शेतास खडीन असे म्हणतात. खरं तर खडीन हे शेत नंतर, आधी तो तलावच आहे. मरुभूमीत शेकडो मण धान्य याच खडीनमध्ये तयार होत आहे. जोधपूर, जैसलमेर, बाडमेर क्षेत्रांत शेकडो खडीन आजही आहेत.

पालीवाल हे अत्यंत स्वाभिमानी होते. एकदा राजाशी वाद झाला म्हणून जैसलमेरजवळील अनेक पालीवाल रातोरात त्यांची गावे सोडून निघून गेले. पालीवालांची अनेक गावे ओस पडली. एकाहून एक सुंदर महागडी घरे, विहिरी, खडीन या सर्वांचा त्याग करून पालीवाल राज्याच्या बाहेर निघून गेले. ओस पडलेली त्यांची गावे व घरे, जैसलमेरमध्ये पर्यटकांना येथील गाईड आजही गर्वाने दाखवितात. पालीवाल येथून कुठे गेले याचा नक्की अंदाज नाही. बहुधा आगरा व जौनपूरला जाऊन वसले असावेत.


महाराष्ट्रातील चित्पावन ब्राह्मणसुद्धा तलावनिर्मितीच्या कामात गुंतलेले होते. ब्राह्मण तलाव खोदत, माती वाहून नेत हे इतर ब्राह्मणांना रुचत नसे. चित्पावन ब्राह्मण वासुदेव चितळेंची अशी कथा सांगितली जाते की, वासुदेवाने अनेक तलाव व विहिरी निर्माण केल्या.

परशुराम क्षेत्रात एका मोठ्या सरोवराचे काम वासुदेव करीत होते. त्या वेळी अनेक ब्राह्मणसुद्धा माती खोदत होते. देवरुखवरून आलेल्या ब्राह्मणांनी त्या कामास विरोध केला. यावर संतप्त होऊन वासुदेवाने त्यांना शाप दिला की जे ब्राह्मण तुम्हांला साथ देतील ते तेजहीन बनून लोकनिंदेस पात्र होतील. ते सर्व देवरुखे ब्राह्मण तेजहीन झाले की नाही आणि लोकनिंदेस पात्र ठरले की नाही माहीत नाही. मात्र चित्पावन ब्राह्मण आपल्या क्षेत्रात आणि देशातसुद्धा प्रत्येक विषयात आपली विशेष छाप पाडत असतात.



जैसलमेरजवळील पोकरना येथे राहणारा एक समूह तलावनिर्मितीचे काम करीत असे. प्रसिद्ध तीर्थ पुष्करजी येथील तलावनिर्मितीचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले होते. सर्वदूर सर्वबाजूंनी वाळूने घेरलेल्या या क्षेत्रात रात्रंदिवस मेहनत करून एका सुंदर तलावाची त्यांनी निर्मिती केली. जेव्हा तो तलाव पाण्याने भरला तेव्हा प्रसन्न होऊन हे काम करणाऱ्यांना ब्राह्मणांचा दर्जा देण्यात आला. त्यामुळेच पुष्करणा ब्राह्मणांच्या घरी कुदळरूपी मूर्तीची पूजा आजही केली जाते.

आपल्या संपूर्ण शरीरावर रामाचे नाव गोंदून घेणारे व राम नावाची शाल शरीराभोवती लपेटणारे छत्तीसगढचे रामनामी तलावनिर्मितीचे उत्तम जाणकार होते. मातीचे काम म्हणजे रामाचे नाम असेच ते समजत.



रायपूर, बिलासपूर आणि रायगढ जिल्ह्यांत विखुरलेल्या या संप्रदायाचे लोक छत्तीसगढ क्षेत्रात फिरून तलाव खोदत असत. त्यांच्या या कायम फिरतीच्या कामामुळेच त्यांना बंजारा मानले जाई. बंजाऱ्यांनी त्यांचा तलाव बांधला असे म्हणणारे लोक छत्तीसगढमधील अनेक गावांत आजही आढळतील. हिंदू असूनही रामनामी परिवारातील लोक मृत शरीरास अग्निसंस्कार न देता मातीत गाडत असत, कारण मातीपेक्षा श्रेष्ठ त्यांच्यासाठी काहीही नाही.

जीवनभर रामाचे नाव घेत तलावाचे काम करणाऱ्या या लोकांच्या जीवनाच्या पूर्ण विरामाची यापेक्षा पवित्र पद्धत अजून कोणती बरे असेल? आज हे सर्व नाम अनाम झालेत. त्यांच्या नावाचे स्मरण करणारी गजधरापासून रामनामीपर्यंतची ही नाममाळा अपूर्णच आहे. सर्व ठिकाणी तलावनिर्मिती होत असे आणि सर्व ठिकाणी ते बनविणारे लोक होते.

शेकडो - हजारो तलाव शून्यातून प्रकट झालेले नाहीत. ते बनविणाऱ्या लोकांना मात्र आज शून्य बनविण्यात आले आहे.

❖❖❖

# सागराचे आगार

स्वत:मध्ये विलीन होणारे एक महाशून्य म्हणजे तलाव होय. पशूंच्या खुरांनी बनलेला खड्डा, ज्यात पावसाचे पाणी आपोआप भरले जाईल, त्याला तलाव म्हणत नाहीत. या शून्याला अत्यंत विचारपूर्वक व बारकाईने बनवावे लागते. छोट्यापासून मोठ्यापर्यंत तलावांची अनेक अंगप्रत्यंगे असतात. प्रत्येक अंगाचे एक विशेष काम असते, आणि त्यामुळेच त्यास एक विशेष नावही असे. ते नाव तलाव बनविणाऱ्या समाजाची भाषा आणि बोलीच्या समृद्धीचा एक पुरावा असे. परंतु जसजसे हा समाज तलावाच्या बाबतीत गरीब होत गेला तसतसे त्या भाषेतून हे नाव आणि शब्द हळूहळू लोप पावत गेले.

पाणलोट क्षेत्रातील पाणी जेथे येऊन जमा होते, त्याला तलाव म्हणत नाहीत. त्याला आगर म्हणतात. अनेक अंगे-उपांगे एकत्र जोडून मग त्याचा तलाव होतो. आगर म्हणजे घर, खजिना. आगर हा तलावाचा खजिनाच तर आहे; जिथे सारे पाणी येऊन जमा होणार आहे. तलावाशिवाय दुसऱ्या अर्थानेसुद्धा आगर किंवा आगार असे संबोधतात. हे नावसुद्धा असेच बनले आहे. आगर नावाची गावे अनेक प्रदेशांत सापडतील.

पाणलोट किंवा आगौर व आगर ही सागराचे दोन प्रमुख अंगे मानण्यात आली आहेत. त्यांना वेगवेगळया क्षेत्रांत वेगवेगळया नावाने ओळखले जाते. काही ठिकाणी आगौरला आव म्हणतात तर काही ठिकाणी पायतान. काही ठिकाणी यास भराव असेही म्हणतात. आंध्र प्रदेशमध्ये यास परिवाह प्रदेशम् म्हणतात. आगरमध्ये आगौरमधून पाणी येते, परंतु काही ठिकाणी मध्य भागात विहीर खोदतात. या स्रोतातूनसुद्धा तलावास पाणी येते. यास बोगली असे म्हणतात. बिहारमध्ये बोगली असणारे शेकडो तलाव आहेत. बोगलीचे दुसरे नाव चुहर असेही आहे.


पाण्याच्या या आगराचे म्हणजे बहुमोल खजिन्याचे रक्षण पाळू किंवा पाल करते. पाल हा शब्द पालक या शब्दापासून आला असावा. पालला काही ठिकाणी भिंड असे संबोधतात. तसेच आकाराने लहान असेल तर पिंड, बिहारमध्ये भिंड, तर काही ठिकाणी महार असेही म्हणतात. पुश्ता शब्द नंतर आला आहे असे वाटते. काही भागांत याला पार असेही म्हणतात.

पार सोबतच शब्द आहे आर. पार आणि आर शब्दांवरून तयार झालाय आरपार. आणि नंतर पारावार. पारावार हा शब्द पाण्याशी संबंधित होता; परंतु कितपत आनंद झाला आहे हे दर्शविण्यासाठी पारावार हा शब्दप्रयोग आजही केला जातो. परंतु पूर्वी हा शब्द पाण्यापासून मिळणाऱ्या आनंदास पारावार नाही असाच उपयोगात असावा.


पार किंवा पाल मजबूत असते. परंतु त्याची देखभाल जर व्यवस्थित नसेल तर तलावात वारंवार भरणारे पाणी न जाणो केव्हा पार वरून पार होईल आणि त्या वेळेचा त्याचा प्रचंड वेग आणि शक्ती बघता त्याला केव्हा नष्ट करील हे सांगता येत नाही. तलावास फुटण्यापासून वाचविणारे अंग म्हणजे अफरा अथवा सांडवा होय. आगर तलावाचे पोट आहे. मात्र हे पोट एका ठराविक मर्यादेपर्यंतच भरावे लागते. तरच तो तलाव वर्षभर पाणीसाठा करू शकेल. आणि जर का या मर्यादेचे उल्लंघन झाले तर तलावास धोका असतो. पोट पूर्ण भरले आणि तरीही पाणी जमा होत गेले तर जास्तीचे पाणी रिकामे करणे गरजेचे ठरते. ते काम सांडवा करतो आणि पोट फुटण्यापासून अथवा पाल तुटण्यापासून तलाव वाचतो.

या भागाला अनेक नावे आहेत. कुठे अपरा तर कुठे उबरा, ओबेरा असेही म्हणतात. चांगला पाऊस झाला आणि तलाव भरून पाणी सांडव्यावरून वाहू वागले की, मध्य प्रदेश उत्तर प्रदेशच्या काही भागांत चादर चलना किंवा अपरा चलना असे म्हणतात. छत्तीसगढ भागात सांडव्यास छलका असेही म्हणतात.

याच भागाचे जुने नाव उच्छवास असे होते. पाणी बाहेर जाते म्हणून निकासी असेही म्हणत. परंतु संस्कृतमधून शब्द आलाय नेष्टा. न + इष्ट = नेष्ट. इष्ट नसलेले पाणी जिथून सोडले जाते त्या भागाला नेष्टा असे म्हणतात. राजस्थानचे थर क्षेत्र, जैसलमेर, बिकानेर, जोधपूरमधील सर्वच भाग, गावे व शहरे इत्यादी सर्व ठिकाणी या भागास नेष्टा असेच संबोधतात. सीमा पार केल्यानंतर सिंध प्रांतातही नेष्टाच म्हटले जाते. दक्षिणेत यास कालंगल तर बुंदेलखंडात यास बगरण असे म्हणतात.



नेष्टाला पहिल्या वर्षी खूप छोटा बनवितात. पालपेक्षा खूप खाली नेष्टाची उंची ठेवतात. नवीन पाल पाणी पिणार, काही ठिकाणी खचेलही. त्यामुळे जास्त पाणी अडविण्याचा लोभ टाळला जातो. जेव्हा एका पावसाळ्यात मामला पक्का होतो तेव्हा पुढच्या वर्षी नेष्टांची उंची थोडी वाढवितात. त्या वेळी तलावात जास्त पाणी अडविले जाते.



नेष्टा हा मातीच्या कच्च्या पाळूपेक्षा कमी उंचीचा भाग आहे. परंतु हा भाग पाण्याचा मुख्य जोर झेलतो, त्यामुळेच नेष्टाचे बांधकाम दगडचुन्यात पक्के केले जाते. नेष्टाच्या दोन्ही बाजूंचा भाग अर्धगोलाकार बनविला जातो. त्यामुळे पाण्याचा वेग त्यावर आदळल्यानंतर थोडा कमी होण्यास मदत होते. लहान नदी-नाल्यावर असणाऱ्या छोट्या बांधावर नेष्टासारख्या भागाचे बांधकाम करतात त्यास ओड असे म्हणतात. पंख्यासारख्या आकारामुळे यास पंखा असेही काही ठिकाणी संबोधले जाते.

नेष्टा हा शुद्ध तांत्रिक भाग आहे. परंतु काही ठिकाणी तांत्रिक असूनही तो कलेस स्पर्श करतो. ज्या निपुण गजधरांचे वर्णन यापूर्वी केले आहे त्यांच्या हस्ते अशी कलात्मक कामे सहज होत. राजस्थानच्या जोधपूर जिल्ह्यात एक छोटे शहर आहे फलौदी. तेथे शिवसागर नावाचा एक तलाव आहे. याचा घाट लाल दगडांत बांधलेला आहे. हा घाट एका सरळ रेषेत जाता जाता एकदम सर्पाकार रूप घेतो. ही अर्धवृत्ताकार गोलाई तलावातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा वेग कमी करते. भूमितीचा हा सुंदर खेळ! खेळा खेळातच अतिरिक्त पाण्याला बाहेर काढून शिवसागर तलावाचे कलात्मक पद्धतीने रक्षण करतो.

चला परत आगौरकडे जाऊ या. आगरमधील पाणी येथूनच येते. फक्त पाणीच आणावयाचे आहे. माती आणि वाळू नको. त्यामुळेच आगौरमधून येणारे त्या त्या ओहळाचे पाणी वळवून वळवून काही प्रमुख रस्त्याने आगरकडे आणले जाते. अशा प्रकारे तलावात येण्यापूर्वीच या जलधारांना खुरा लावला जातो. खुरा हा शब्द प्राण्यांच्या खूरपासून बनला असावा. याचा आकार पशूंच्या खुरासारखाच असतो. मोठे मोठे दगड अशाप्रकारे रचून ठेवत की त्यामधून फक्त पाणीच बाहेर जाईल व रेती आणि माती मागेच अडविली जाईल.

वाळवंटी क्षेत्रात रेतीचे प्रमाण मैदानी भागापेक्षा खूपच जास्त असते. त्यामुळे त्या भागात तलावाचा खुरा खूप व्यवस्थित व कच्च्याऐवजी पक्का सुद्धा बांधलेला असतो. दगडांमध्ये चुन्याचा मसाला भरून दोन मजली पूल बनवीत. ज्याच्या वरच्या मजल्यावरील खिडक्यांना असलेल्या छिद्रातून येणारे पाणी त्या छिद्राच्या खाली असणाऱ्या नालीत जमा होते आणि पाण्यातील दगडगोटे, वाळू, मातीचे कण तिथेच ठेवून स्वच्छ पाणी पुन्हा तळमजल्यावरील खिडकीच्या छिद्रातून आगौरकडे जाते. अनेक प्रकारच्या छोट्यामोठ्या खालीवर असणाऱ्या व पाणी गाळून आगौरकडे पाठविणाऱ्या या भागास छेदी असे म्हणतात.


याप्रकारे अडविलेल्या मातीसही अनेक नावे आहेत. कुठे याला साद म्हणतात. कुठे गाद, लद्दी तर कुठे तलछटसुद्धा. संपूर्ण काळजी घेऊनही दरवर्षी पाण्यासमवेत थोडी तरी माती आगरमध्ये येतेच. ती काढण्यासाठी विशिष्ट वेळा व विशेष प्रकार असत, त्याचे विवरण नंतर. आता पुनश्च पाळूवर जाऊ या. पाळू काही ठिकाणी सरळ तर कुठे चंद्राकार. काही ठिकाणी बीजेच्या चंद्रासारखी, तर काही ठिकाणी हात कोपरात वळतो तशी वळलेली असे.

या वळणास कोहणी मोड असे हिंदीत म्हणत. ज्या ठिकाणी आगौरमधून येणाऱ्या पाण्याचा मोठा झटका लागण्याची शक्यता आहे, त्या ठिकाणी पालची मजबुती वाढविण्यासाठी पाल हाताच्या कोपराप्रमाणे वळवीत असत.

जिथे शक्य आहे, सामर्थ्य आहे, त्या ठिकाणी पाल आणि पाणी यांच्यामध्ये दगडांचे पाट बांधतात. रेती, चुना, बेलफळ, गूळ, गोंद आणि मेथी तसेच काही ठिकाणी राळ इ. चे मिश्रण करून त्या मिश्रणाने लहान दगड एक दुसऱ्याशी जोडले जात. मोठे वजनदार दगड खाच आणि पाचर पद्धतीने जोडत असत. या पद्धतीत एका दगडात खाच पाडत व दुसऱ्या दगडात त्याच मापाची पाचर करून एक दुसऱ्यात अडकवीत.


कधीकधी मोठे दगड लोखंडाच्या पट्टीने जोडत. अशा पट्टीला जोकी किंवा अकुंडी म्हणत. दगडाचे हे पाट, पालच्या मातीस आगरमध्ये येण्यास अटकाव करीत. दगडाच्या या पट्ट्यास हिंदीत पठियाल म्हणत. या पठियालवर सुंदर मंदिर, बारादरी, छत्री आणि घाट बनविण्याच्या प्रथा असत. तलाव आणि पालचा आकार फार मोठा असेल तर घाटावर दगडांच्या पायऱ्या बनवीत. कुठे खूप मोठा आणि खोल तलाव असला तर पायऱ्यांची लांबी संख्या त्या प्रमाणात वाढत असे. अशा वेळी पालप्रमाणेच या पायऱ्यांनाही मजबुती देण्याची व्यवस्था केलेली असे.

असे न केले तर पाण्याच्या जोराने पायऱ्या तुटण्याची शक्यता असे. यांना आधार देण्यासाठी साधारण मध्यभागी ओट्यासारख्या मोठ्या पायऱ्या बांधीत. प्रत्येक आठ ते दहा पायऱ्यांनंतर येणाऱ्या या भागास हिंदीत हथनी असे संबोधत.



अशाच एका हथनीच्या भिंतीमध्ये एक मोठा गाळा सोडीत आणि त्यात घटोईया बाबांची स्थापना करीत. घटोईया देवता घाटाचे रक्षण करते. सांडव्याच्या उंचीच्या प्रमाणात यांची स्थापना करीत. घटोईया बाबांच्या चरणापर्यंतची पातळी म्हणजे सांडव्याच्या माथ्याची पातळी असे. जर आगौरमध्ये जास्त पाऊस झाला व आगरमधील पातळी उंचावत घटोईया बाबाच्या चरणापर्यंत आली रे आली की सांडव्यावरून पाणी वाहण्यास सुरुवात होईल व धोका टाळला जाईल. अतिरिक्त पाण्यास वाट मिळाल्याने आगरमधील पाण्याची पातळी वाढणार नाही अशी ती योजना असे. याप्रकारे घाट व तलावाचे रक्षण देवता आणि मनुष्य मिळून करीत.

तलावाप्रमाणेच नदीच्या घाटावरही घटोईया बाबांची स्थापना करण्याची परंपरा आजही चालू आहे. पुराच्या दिवसांत वयस्क व्यक्ती, आजी, आजोबा (जे घाटावर स्वतः जाऊ शकत नाहीत ते) घाटावरून परतणाऱ्या आपल्या नात - नाती, मुलगा/मुलगी वगैरेंना खूप उत्सुकतेने प्रश्न विचारतात, "पुराचे पाणी कुठपर्यंत चढलंय? घटोईया बाबांच्या चरणाला पाणी लागले का?" त्यांच्या पायाला पाण्याचा स्पर्श झाला म्हणजे मिळविले, इतके पाणी तलावात आले की मग वर्षभर काळजी नाही.



वेगवेगळया ठिकाणी उभे केलेले स्तंभ, आगरमधील जलराशीचे खजिन्याचे मोजमाप करण्याचे काम वर्षभर करतात. नागयष्टी फार जुना शब्द आहे. नवीन खोदलेल्या तलावातील पाण्याची पातळी मोजण्याच्या कामात नागयष्टीचा उपयोग होत असे. यावर नेहमी नाग इत्यादी कोरलेले असत. ज्यावर नाग कोरलेला नाही अशा स्तंभास फक्त यष्टी म्हणत. हळूहळू हा शब्द 'लाठ' बनला. यालाच स्तंभ, जलथंब किंवा थंभ असेही म्हणत. काही ठिकाणी याला पनसाल किंवा पौसरा असे म्हणत. हे स्तंभ वेगवेगळया ठिकाणी लावत. ते लावण्याच्या वेळा आणि प्रयोजन वेगवेगळे असे.

स्तंभ तलावाच्या मध्य भागात, सांडव्यावर, मुखावर म्हणजे जेथून सिंचन होते तिथे, तसेच आगौरमध्ये लावले जात. यामध्ये फूट, गज इत्यादी नीरस चिन्हांऐवजी पद्म, शंख, नाग, चक्रसारखी चिन्हे कोरली जात. सिंचनाकरिता बनविलेल्या तलावाच्या स्तंभावर एका विशिष्ट चिन्हापर्यंत पाण्याची पातळी उतरली की, पाण्याचा उपयोग त्वरित थांबवून संकटकाळी उपयोग करण्याकरिता सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था केली जात असे. काही ठिकाणी पालवरसुद्धा स्तंभ लावले जात. पण पालवर लावलेला स्तंभ बुडण्याचा अर्थ प्रलय होणे असा आहे.

हे स्तंभ लाकडी किंवा दगडाचे बनवीत. लाकडाची जात अशी निवडत की लाकूड मजबूत असेल; पण पाण्यात सडणार नाही. या लाकडाचे जुने नाव क्षत्रिय काष्ठ असे होते. साल जांभूळ, ताड, तसेच सरईचे लाकूड या कामी वापरले जात असे. साल लाकडाच्या मजबुतीवरून अनेक म्हणी प्रचलित आहेत. त्यातील हिंदीतील म्हण 'हजार साल खडा, हजार साल पडा, और हजार साल सडा' म्हणजे 'हजार वर्षं उभा, हजार वर्षं पडलेला व हजार वर्षं सडलेला' असे हे वृक्ष आहेत. छत्तीसगढमधील अनेक तलावांवर आजही साल वृक्षाचे स्तंभ आढळतील.

रायपूर येथील पुरातत्व संग्रहालयात वरील म्हण सार्थ करणारा शेकडो वर्षं जुना साल वृक्षाचा एक तुकडा ठेवलेला आहे. चंद्रपूर आता बिलासपूर जिल्ह्यातील किरानी गावातील हिराबंध नावाच्या तलावात आढळलेल्या जलस्तंभाचा तो अवशेष आहे. हिराबंध तलाव दुसऱ्या शतकाच्या पूर्वी असणाऱ्या सातवाहनांच्या काळातील आहे. यावर राज्याच्या अधिकाऱ्यांची नावे कोरलेली आहेत. हा भव्य तलाव भरण्याच्या समारंभाला बहुधा हे अधिकारी उपस्थित असावेत.

परिस्थिती बदलली नाही तर लाकूड खराब होत नाही. स्तंभ नेहमी पाण्यातच बुडलेलेच असत त्यामुळे वर्षानुवर्षे खराब होत नसत.

**स्तंभ तलावाची जल पातळी दर्शवीत.**
**परंतु तलावाची खोली**
**बहुधा पुरुषात मोजली जात असे.**
**दोन्ही हात पसरून**

**उभ्या राहिलेल्या पुरुषाच्या एका हातापासून**
**दुसऱ्या हातापर्यंतच्या एकूण लांबीस एक**
**पुरुष किंवा परस किंवा पुरख म्हणत.**

काही ठिकाणी पाल किंवा घाटाच्या भिंतीवर वेगवेगळया उंचीवर विविध प्रकारच्या मूर्त्या बसविल्या जात. बहुतांशी त्या मुखाकृती असत. सर्वात खाली अश्वमुख व सर्वात वर हत्तीमुख असे. तलावातील वाढती जल पातळी यांना क्रमाक्रमाने स्पर्श करीत असे, आणि त्यावरून तलावात किती पाणी या वेळेस भरले हे सर्वांना समजत असे. या शैलीतील अमर उदाहरण आहे जैसलमेर येथील अमर सागराच्या भिंतीवरील घोडे, हत्ती आणि सिंहाच्या मूर्त्या.

स्तंभ आणि नेष्टा एक दुसऱ्यांना जोडल्यानंतर तर चमत्कारच घडतो. अलवरपासून शेकडो कि. मी. अंतरावर आहे अरवली पर्वत. या पर्वतावर गावापासून दूर एक तलाव आहे श्यामसागर. युद्धाच्या वेळी सेनेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी १५ व्या शतकात हा बनविला असावा. या सागराच्या किनाऱ्यावर वरुण देवतेचा एक स्तंभ आहे.

स्तंभापासून एक फर्लांग अंतरावर श्यामसागराची नेष्टा आहे. वाढत्या जलाने वरुण देवतेच्या चरणास स्पर्श करताच नेष्टावरून पाणी वाहण्यास सुरुवात होते. आणि त्यानंतर यापेक्षा जास्त पाणी तलावात भरत नाही. वरुण देवता कधीही बुडत नाही.

स्तंभ तलावाची जलपातळी दर्शवीत, परंतु तलावाची खोली नेहमी 'पुरुष' या मापात मोजली जात असे. दोन्ही हात दोन्ही बाजूस पूर्ण पसरून उभ्या राहिलेल्या पुरुषाच्या एका हातापासून दुसऱ्या हातापर्यंतच्या एकूण लांबीस एक पुरुष किंवा परस किंवा पुरख म्हणत.

इंच फुटात जवळजवळ सहा फूट इतकी ती भरते. अशा वीस पुरुष खोल असलेल्या तलावास आदर्श समजले जात असे. तलाव बनविणाऱ्याची इच्छा या 'बीसी' ला स्पर्श करण्याची असे. परंतु बनविणाऱ्याचे सामर्थ्य आणि आगौर व आगरची क्षमता यानुसार तलावाची ही खोली कमीजास्त होत असे.

बहुधा बीसी किंवा त्यापेक्षा जास्त खोल तलावांच्या पालवर आदळणारा लाटांचा वेग कमी करण्यासाठी आगौर आणि आगर यांच्यामध्ये टेकड्या सोडल्या जात. तलाव बनविताना खोल खोदकामातील सारी माती पालवर चढविण्याची गरज नसे, अशा वेळी ती माती जास्त लांब किंवा तलावाच्या बाहेर आणून टाकणेसुद्धा कठीणच असे.

या करिता बीसीसारख्या खोल तलावांमध्ये तांत्रिक आणि व्यावहारिक कारणास्तव एक किंवा अधिक टेकड्या सोडून देत. याच टेकड्यांवर खोदकामातील अतिरिक्त माती टाकीत. तांत्रिक आणि व्यावहारिक सुविधेशिवाय तलावामधूनच वर आलेल्या या टेकड्यांमुळे संपूर्ण दृश्य आणखीनच मनोहारी दिसत असे.

या टेकड्यांना टापू, टिपुआ, द्वीप यांसारखे शब्द प्रचलित आहेत. तथापि, राजस्थानमध्ये तलावाच्या या अंगास एक विशेष नाव देण्यात आले - लाखेटा. लाखेटा लाटांचा वेग तोडतो, एवढेच नव्हे तर तलाव आणि समाज यांना जोडतोसुद्धा. जिथे जिथे लाखेटा आढळतात त्या त्या ठिकाणी त्या क्षेत्रातील सिद्ध संत, सती अथवा स्मरणयोग्य व्यक्तीच्या स्मृतीसाठी सुंदर छत्री लाखेटावर बनविलेली आढळते. लाखेटा मोठा असेल तर छत्रीसमवेत खेजडी आणि पिंपळवृक्षही त्यावर आढळतील.

सर्वात मोठा लाखेटा? आज या लाखेटावर रेल्वेस्टेशन आहे, बस स्थानक आहे आणि प्रतिष्ठित मानले गेलेले औद्योगिक क्षेत्र वसलेले आहे. मध्यरेल्वेने भोपाळवरून इटारसीला जाताना मंडीद्वीप नावाचे हे स्थान एकेकाळी भोपाळ तलावाचा लाखेटा होता. ६५० चौ. कि.मी मध्ये पसरलेला हा विशाल भोपाळ तलाव होशंगशाहच्या काळात तोडण्यात आला. आज हा आकुंचित होऊन पूर्वीच्या तुलनेत खूपच छोटा झालेला आहे. तरी त्याची नोंद देशातील मोठ्या तलावात होते. हा तलाव आटल्यामुळे मंडीद्वीप हे द्वीप न राहता एक औद्योगिक शहर झाले आहे.

प्रणाली आणि सारणी हे दोन शब्द तलावाशी निगडित आहेत. पूर्वी तलावाच्या सिंचन व्यवस्थेसाठी बनविण्यात येणाऱ्या नाल्यांना ही नावे होती. आज शासन प्रणाली व रेल्वेची वेळ दर्शविणारी सारणी अशा अर्थाने या शब्दांचा वापर होतो.

सिंचनाकरिता मुख्य कालवा जेथून निघतो ती जागा मुखाची असते. यालाच मोखा किंवा मुखी असे म्हणतात. मुख्य कालव्यास हिंदीत रजबहा असे म्हणत. काही विशिष्ट तलावाची रजबहा या लोकांतून निघून देवलोकास स्पर्श करीत असे. त्या वेळेस त्याचे नाव रामनाल असे होत असे. जैसलमेरच्या पूर्णतः वाळवंटी भागात असणारा सुंदर बगीचा 'बडाबाग'चे सिंचन जैतसर नावाच्या तलावातून निघणाऱ्या रामनालीनेच होत आले आहे. येथील आमराई व बगीचे इतके घनदाट आहेत की वाळवंटात आग ओकणारा सूर्य इथे येत असेल ते थंडावा घेण्यासाठी आणि तोही हिरव्या रंगात रंगून.

रजबहापासून निघणाऱ्या उपकालव्यांना बहतोल, बरहा, बहिया, बहा आणि बाह असेही म्हणत. कालव्याच्या शेजारी नंतर वसलेल्या भागाचे नामकरण यांच्याच आधारे झाले आहे. उदा. आगऱ्यामधील बाह नावाचा तालुका. सिंचनासाठी तयार केलेल्या छोट्यात छोट्या तलावातून पाणी काढण्यासाठी व्यवस्थित योजना केलेली असे. पालमधून आरपार काढलेल्या नालीचे एक टोक तलावाच्या बाजूने अडसर लावून बंद केलेले असे.

जेव्हा पाणी काढायचे असे तेव्हा अडसर दूर करीत. मात्र हे करण्यासाठी पाण्यात उडी घ्यावी लागे, त्या खोलीपर्यंत जाऊन अडसर दूर करावा लागे आणि याच प्रकारे बंदही करावा लागे. हे धाडसी आणि अवघड काम सोपे करण्यासाठी डाट या अंगाचा उपयोग होत असे.


तलावाच्या आतील बाजूस एक छोटेसे खोल हौदासारखे बांधकाम केलेले असे. एक ते दीड मीटर बाजू असलेल्या चौरस आकाराच्या या बांधकामास डाट असे म्हणतात. यामध्ये पाण्याच्या बाजूस असलेल्या भिंतीत आवश्यकतेनुसार वेगवेगळया उंचीवर दोन किंवा तीन झरोके केलेले असतात. लाकडी ठोकळ्याने सहज बंद करता येईल असा या झरोक्यांचा आकार असे. समोरच्या भिंतीतही याच प्रकारचे झरोके फक्त खालच्या बाजूसच असतात. यामधून पाणी पालच्या दुसऱ्या बाजूस नालीद्वारे बाहेर काढलेले असते. हौदाची खोली ४ ते ६ मीटर असते आणि आत उतरण्यासाठी भिंतीवर दर अर्ध्या मीटरवर दगडांचे तुकडे लावलेले असतात.

या हौदामुळे पाण्याचा अडसर दूर करण्यासाठी तलावात उतरण्याची गरज नाही. फक्त कोरड्या हौदात दगडांच्या पायरीवजा तुकड्यावरून खाली उतरून हव्या त्या झरोक्यातील अडसर दूर करून पाणी चालू करीत असत आणि पालच्या बाजूस असलेल्या नालीतून ते बाहेर येत असे. या प्रकाराशी मिळतीजुळती बांधकामे राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि गोव्यातही आढळतात. नावे मात्र वेगवेगळी - जसे डाट, चुकरैंड, चुरंडी, चौडा, चुंडा आणि उरैंड.

तलावातून कालव्यात सोडलेले पाणी कालव्याच्या तळाला योग्य उतार देऊन दूर अंतरापर्यंत वाहून नेले जाते. परंतु काही मोठ्या तलावामध्ये जेथे मुखाजवळ पाण्याचा दाब जास्त असतो त्या ठिकाणी या दाबाचा उपयोग कालव्यात पाणी चढविण्यासाठीही करीत. याप्रकारे मुखातून निघालेले पाणी काही मीटर उंच चढून पुन्हा उताराने वाहून जास्त दूर तर जातेच पण त्या बरोबर जास्त उंचावरील शेतासही देता येत असे.

मुख्य कालव्याच्या दोन्ही बाजूस काही अंतरावर विहिरी खोदल्या जात. आणि विहिरीवर रहाट लावून पुनश्च पाणी उचलीत असत. तलाव, कालवा, विहीर तसेच रहाट यांचा हा सुंदर मिलाप एकानंतर एक अशा अनेक शेतांना सिंचनाद्वारे जोडत जात असे. ही व्यवस्था बुंदेलखंडमधील चंदेल बुंदेल यांच्या काळात तयार केलेल्या बरुआसागर व अरजरसागरच्या एक हजार क्षेत्रावर आजही कार्यरत आहे. बरुआसागर ओरछाचा राजा उदित सिंहाने, सन १७३७ व अरजरसागर सुरजनसिंहाने सन १६७१ मध्ये तयार केले होते. यांचे कालवे आजही उत्तर प्रदेश सिंचाई विभागाची प्रतिष्ठा उंचावीत आहेत.

पाण्याची चोरी? सर्व व्यवस्था चांगली असूनही पाण्याची चोरी जर थांबली नाही तर बघता बघता चांगला तलावही कोरडा ठाक पडतो. वर्षाऋतूत काठोकाठ भरलेल्या, शरद ऋतूत सुंदर स्वच्छ निळ्या रंगात बुडालेल्या, शिशिरमध्ये शीतल झालेल्या आणि वसंतात आनंदाने झुलणाऱ्या या तलावातील सारे पाणी ग्रीष्म ऋतूत, तळपता सूर्य ओढून घेईल आणि म्हणूनच सूर्याला एक विचित्र नाव 'अंबु तस्कर' पडले असावे.



सूर्यासारखा तस्कर असेल आणि आगर म्हणजेच खजिना बिनपहाऱ्याचा उघड्यावर पडला असेल तर चोरी होण्यात वेळ कसला?


ही चोरी होऊ नये यासाठी पुरेपूर काळजी घेतली जाते. तलावाचे आगर व बुडित क्षेत्र भरपूर उताराचे बनविले जाते. त्यामुळे जेव्हा पाणी कमी होत जाते तेव्हा ते मोठ्या क्षेत्रावर पसरले जात नाही. आगर ढालीसारखे असल्यामुळे पाणी कमी असूनही लहान भागात जास्त प्रमाणात साचून राहते आणि लवकर वाफ होऊन उडत नाही. याच ढालीमध्ये नेहमी थोडीशी खोली ठेवली जाते. अशा खड्ड्याला अखडा किंवा पियाल असे म्हणतात. बुंदेलखंडात यास भर असे म्हणतात. काही ठिकाणी यास बंडारौ अथवा गर्ल या नावाने ओळखले जाते.

या अंगाचे मुख्य स्थान घाटाकडे किंवा तलावाच्या मध्यभागी ठेवतात. मध्यभागी तलाव खोल असेल तर उन्हाळयात सर्व दिशांनी तलाव कोरडा पडू लागतो. अशावेळेस पाणी घाट सोडते हे चांगले दिसत नाही. म्हणून घाटाजवळ खोल खड्डा अथवा पियाल ठेवण्याची पद्धत होती. त्यामुळे तीन बाजूंनी पाण्याची जरी चोरी झाली तरी चौथ्या मुख्य भुजामध्ये पाणी कायम राहत असे.

ग्रीष्म संपण्यापूर्वीच पुन्हा आकाशात ढगांची दाटी होण्यास सुरुवात होते. पाणलोट क्षेत्रातून पाणी तलावात जमा होते आणि पुन्हा सागर लहरायला लागतो.

सूर्य पाणी चोरतो हे खरे, पण देतोही तोच!

❖❖❖



# साफ डोक्याचा समाज

तलावात पाणी येते आणि जाते. या आवक आणि जावकचा परिणाम संपूर्ण तलावावर होतो. पावसाच्या वेगवान थेंबाने पाणलोट क्षेत्रातील माती धुपली जाते आणि बुडित क्षेत्रात वाहून आणली जाते. बांधाची माती कापली जाते आणि तलाव गाळाने भरून जातो.

तलावाचे स्वरूप बिघडविणारा निसर्गाचा खेळ नियमित रूपाने चालतो. त्यामुळे तलाव बनविणारे लोक व तलाव बनविणारा समाज तलावाचे स्वरूप वाचविण्याचा खेळ तेवढ्याच नियमाने खेळत आला आहे. जे तलाव बघता बघता मागील पन्नास-शंभर वर्षांत नष्ट करण्यात आले, त्या तलावांनी अशा नियमित खेळामुळेच तर शेकडो वर्षांपर्यंत समाजाचा खेळ व्यवस्थित चालविला होता.

पहिल्या वेळेस पाणी भरताच तलावाच्या देखभाल दुरुस्ती व रक्षणाच्या कामास सुरुवात होत असे. हे काम सोपे नव्हते. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत असलेल्या हजारो तलावांना सुस्थितीत ठेवण्याचे काम समाजाच्या शिरावर होते. त्यामुळे या कठीण कामाला इतके व्यवस्थित बनविण्यात आले होते की हे सर्व अगदी सहज रूपात होत असे.

पाणलोट क्षेत्रात पाय ठेवताच देखभाल दुरुस्तीचे पहिले काम दृष्टीस येई. देशातील बऱ्याच भागांत तलावाच्या पाणलोट क्षेत्राची सुरुवात झाल्याची सूचना देणारे सुंदर स्तंभ लावलेले दिसत. हे स्तंभ बघताच आपण तलावाच्या पाणलोट क्षेत्रात उभे आहोत हे लक्षात येत असे. या भागातील पाणी तलावात जमा होणार आहे, त्या करिता हे क्षेत्र स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. विष्ठा टाकणे तर दूरच, येथे तर थुंकणेसुद्धा निषिद्ध आहे. थुंकण्यास मनाई आहे असे फलक तिथे लावलेले नसत. परंतु फक्त स्तंभ बघूनच सर्वजण या गोष्टी लक्षात ठेवीत.

बुडित क्षेत्रातील पाण्याची स्वच्छता आणि शुद्धता कायम ठेवण्यासाठी पहिल्या दिवसापासूनच सुरुवात होत असे. ज्या दिवशी नवीन तयार केलेल्या तलावात पाणी भरते, त्याच दिवशी तिथे जीवजंतू आणून सोडीत. त्यात मासळी, कासव, खेकडे आणि तलाव फारच मोठा आणि खोल असेल तर, मगरसुद्धा सोडत. काही ठिकाणी जीवजंतूच्या समवेत सोन्याचांदीच्या जीवजंतूचे तलावात विसर्जन करीत. मध्य प्रदेशमधील रायपूर शहरातील एका तलावात पन्नास साठ वर्षांपूर्वी सोन्याची नथ घातलेली कासवे सोडण्यात आली होती.

पहिल्या वर्षी पाण्यात काही विशिष्ट प्रकारच्या वनस्पती टाकण्यात येत. वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांचे प्रकार बदलत पण काम मात्र एकच; पाणी स्वच्छ ठेवणे. मध्य प्रदेशमध्ये गदिया अथवा चिला ही वनस्पती तलावात सोडीत, तर राजस्थानमध्य कु.नदिनी, निर्मली किंवा चाक्षुष. चाक्षुषपासूनच चाकसू शब्द बनला आहे. चाकसूचा वापर खूप मोठ्या प्रमाणावर झाला असावा.

आज जयपूरजवळ एका मोठ्या भागाचे नाव चाकसू आहे. हे नामकरण चाकसू वनस्पतीबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच झाले असावे. पाल वर पिंपळ, बरगद आणि गुलर हे वृक्ष लावण्याची प्रथा असे. तलाव आणि या वृक्षाची वयात नेहमीच शर्यत लागली असावी असे वाटते. कोण जास्त टिकणार? हे वृक्ष की हा तलाव? मात्र हा प्रश्न बहुतांशी अनुत्तरितच राहिला.

दोघांनाही एक दुसऱ्याची दीर्घ सोबत इतकी आवडली की उपेक्षेच्या या सध्याच्या काळातही जो आधी गेलाय, त्याच्या विरहात शोक करीत त्याच्या मागे मागे दुसराही गेला. जिथे आधी वृक्षतोड झाली तेथील तलावही काही अवधीतच कोरडे पडले. आणि जिथे आधी तलाव नष्ट झाले, तेथील वृक्षसुद्धा फार काळ तग धरू शकले नाही.

तलावावर आम्रवृक्षसुद्धा मोठ्या प्रमाणावर लावण्यात येत, परंतु ते पाळूपेक्षा पाळूच्या खालील जमिनीवर मोठ्या प्रमाणात आढळतात. छत्तीसगढ क्षेत्रात बहुतांशी तलावावर शीतलामातेचा वास आहे असे मानले जाते आणि त्यामुळे अशा तलावाच्या पाळूवर शीतलामातेस प्रिय असणारे कडुलिंबाचे वृक्ष लावत असत. वृक्षाविना पाळू म्हणजे जणू मूर्तीविना मंदिर!

बिहार आणि उत्तर प्रदेशाच्या अनेक भागांत पाळूवर अरहरचे वृक्ष लावीत. याच भागात नवीन तयार केलेल्या तलावावर उंदरासारख्या प्राण्यांनी बिळे बनवून पाळू कमकुवत करू नये या करिता मोहरीच्या ढेपेचा धूर करीत असत.

ही सर्व कामे तलाव बनल्यानंतर एकदाच करावी लागतात. फारच आवश्यकता वाटली तर आणखी एखादे वेळी. तलावात माती मात्र प्रत्येक वर्षी जमा होते. त्यामुळे प्रतिवर्षी ती काढण्याची व्यवस्था सुंदर नियम तयार करून करण्यात आली होती.

काही ठिकाणी गाळ काढण्याच्या या कठीण श्रमास उत्सवाचे रूप देऊन आनंददायी बनविण्यात आले होते, तर काही ठिकाणी अशी व्यवस्था करण्यात आली की जितक्या गुपचूप माती तलावाच्या तळात येऊन बसे तितक्याच गुपचूपपणे ती बाहेर काढून पाळूच्या वर जमा करण्यात येई.

**जुने तलाव साफ केले तर नाहीच नाही,**
**आणि नवीन तर बनलेच नाही,**
**गाळ हा तलावात नाही,**
**तर नवीन समाजाच्या डोक्यात भरलेला आहे.**
**त्या काळी समाजाचे डोके साफ होते,**
**त्यांनी गाळ ही अडचण म्हणून नव्हे**
**तर तलावाचा प्रसार म्हणून ग्रहण केला.**

गाळ काढण्याच्या वेळा वेगवेगळया क्षेत्रांतील हवामानानुसार ठरविण्यात येत असत. त्या वेळेस तलावात सर्वात कमी पाणी असावयास हवे. गोवा आणि पश्चिम घाटाच्या किनाऱ्यावरील क्षेत्रांत हे काम दिवाळीनंतर लगेच हाती घेत.

उत्तरेतील बहुतेक भागांत नवीन वर्षाच्या सुरुवातीस म्हणजे चैत्राच्या पूर्वी आणि छत्तीसगढ, ओरिसा, बंगाल, बिहार आणि दक्षिणेत पावसाळा सुरू होण्यापूर्वी शेते तयार करताना हे काम करीत असत.

आज तलावांशी संबंध न ठेवणारा समाज व त्या समाजास चालविणारे प्रशासन तलावांची साफसफाई आणि त्यातील गाळ काढण्याचे काम याकडे एक गंभीर प्रश्न म्हणूनच पाहत आहे आणि याचे उत्तर शोधण्याऐवजी खोट्या सबबी पुढे करून प्रश्न टाळीत आहे.


त्यांच्या नवीन हिशोबानुसार हे काम खर्चिक आहे. अनेक जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रातील तलावांतील गाळ न काढण्याचे वेळोवेळी असे कारण सांगितले की, हा खर्च इतका जास्त आहे की त्यापेक्षा नवीन तलाव बनविणे स्वस्त पडेल. त्यामुळे जुने तलावही साफ केले नाहीत आणि नवीन तर बनलेच नाहीत. गाळ तलावात नाही तर नवीन समाजाच्या डोक्यात भरलेला आहे.

त्या काळी समाजाचे डोके साफ होते. त्यांनी गाळ ही अडचण म्हणून नव्हे तर तलावाचा प्रसाद समजून ग्रहण केला. प्रसाद ग्रहण करण्यास पात्र होते ते शेतकरी, कुंभार आणि सामान्य लोक. हा प्रसाद घेणारे शेतकरी प्रति गाडीप्रमाणे गाळ काढीत, आपली गाडी भरीत आणि तो गाळ शेतात पसरवून शेत अधिक सुपीक बनवीत. या प्रसादाच्या बदल्यात प्रति गाडीच्या हिशोबाप्रमाणे रोख रक्कम किंवा पिकाचा काही अंश ग्राम कोशात जमा करीत.

नंतर याच रकमेतून तलावाच्या दुरुस्तीचे काम होत असे. छत्तीसगढमध्ये आजही तलावातून गाळ काढण्याचे काम मुख्यतः शेतकरी कुटुंबेच करतात. दूरदूरपर्यंत आज साबण पोहोचलाय तरीही अनेक घरांतून गाळाने डोके धुऊन व स्नान करण्याची प्रथा अजूनही चालू आहे.

बिहारमध्ये या कामास उडाही असे म्हणतात. उडाही ही समाजसेवा आहे. गावातील प्रत्येक घरातील काम करू शकणारे सदस्य तलावावर एकत्र येत. प्रत्येक घर दोन ते पाच मण माती काढीत असे. कामाच्या वेळी तेथेच गुळाचे पाणी वाटत असत. पंचायतमध्ये जमा झालेल्या एकूण रकमेपैकी एक भाग उडाहीच्या संयोजनात खर्च होत असे.

दक्षिणेत धर्मादा नावाची प्रथा होती. काही ठिकाणी या कामासाठी गावाच्या जमिनीचा एक हिस्सा दान केला जात असे आणि त्यातून मिळणारे उत्पन्न फक्त गाळ काढण्याच्या कामी खर्च करीत. अशा भूमीला कोडगे म्हणत.



शासन आणि समाजाने एकत्र येऊन कंबर कसली तर कामात दिरंगाई कशी होईल? दक्षिणेत तलावांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाबाबत शासन आणि समाज यांच्यातील ताळमेळ खूपच व्यवस्थित होता. शासनाच्या खजिन्यातून या कामासाठी अनुदान मिळत असे, परंतु त्याच बरोबर प्रत्येक गावात या कामाकरिता एक स्वतंत्र निधी तयार होईल अशीसुद्धा व्यवस्था होती.

प्रत्येक गावात काही जमीन, काही शेते किंवा शेतांचा काही भाग तलावांच्या व्यवस्थेकरिता वेगळा ठेवीत. यावर कर आकारला जात नसे. या भूमीला मान्यम् म्हणत. मान्यम् मुळे होणारी बचत, उत्पन्न अथवा मिळणारे पीक, तलावासंबंधीची वेगवेगळी कामे करणाऱ्या लोकांना दिली जात असे. जितक्या प्रकारची कामे तितक्या प्रकारचे मान्यम्. जे काम जेथे होणार आहे तेथूनच त्याचा प्रबंध केला जात असे. त्याला लागणारा खर्चसुद्धा तेथूनच गोळा केला जात असे.

अलौति मान्यम्‌मधून श्रमिकांच्या मोबदल्याची व्यवस्था केली जाई. अणैंकरण मान्यम्‌ वर्षभर तलावाची देखरेख करणाऱ्यांसाठी होता. यातूनच त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालत असे. ही मंडळी जनावरांना तलावांच्या पाळूवर जाऊ देत नसत. पाळूप्रमाणेच तलावाच्या पाणलोट क्षेत्रातही पशूंना जाण्यास बंदी होती. या कामावरही वर्षभर लोक लावलेले असत. त्यांची व्यवस्था बंदेला मान्यम्‌मधून होत असे. तलावाशी संबंधित शेतांची पेरणीपासून कापणीपर्यंत जनावरांपासून राखण करणे हे एका निश्चित काळापर्यंत चालणारे काम होते. तेसुद्धा बंदेला मान्यम्‌मधूनच पूर्ण होत असे. हे करणाऱ्यांना पट्टी म्हणत.

सिंचनाच्या वेळी कालव्याचे डाट उघडणे व वेळेवर पाणी पोहोचविणे ही एक वेगळीच जबाबदारी होती. याची व्यवस्था नीरमुनक्क मान्यम्‌मधून केली जात असे. कोणी शेतकरी पाण्याचा अपव्यय तर करीत नाही ना, हे पाहणाऱ्यांना कुलमकवल मान्यम्‌मधून वेतन मिळत असे.

तलावत किती पाणी आले, किती शेतात कोणते पीक पेरले, कुणाला किती पाणी हवे असे प्रश्न नीरघंटी अथवा नीरुकुट्टी सोडवीत असत. हे पद दक्षिणेत फक्त हरिजन कुटुंबालाच मिळत असे. तलावातील पाण्याची पातळी पाहून शेतांना न्यायोचित वाटपाचे बारकाव्याने हिशोब करण्याची विलक्षण क्षमता नीरकुट्टींना वारशाने मिळे.

आजच्या काही नवीन समाजशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की हरिजन कुटुंबाला हे पद देण्यात समाजाचा स्वार्थ होता. या कुटुंबाकडे जमीन नसे. त्यामुळे जमीनधारकांच्या शेतांना पाणी देण्याचे काम ते निःपक्षपातीपणाने करू शकत. जर भूमिहीन असणे हीच योग्यता असती तर भूमिहीन ब्राह्मणासही हे पद नेहमी मिळाले असते. जाऊ द्या, ही गोष्ट आपण येथेच सोडूया आणि पुनश्च मान्यम्‌कडे वळू.

बऱ्याच तलावाचे पाणी सिंचनाशिवाय पेयजल म्हणूनही उपयोगात आणले जाई. अशा तलावातून घरापर्यंत पाणी घेऊन येणाऱ्या कहारांचे वेतन उरणी मान्यम्‌मधून होत असे.

उप्पार आणि वादि मान्यम्‌मधून तलावाची सर्वसाधारण फूटतूट दुरुस्त केली जाई. वायक्कल मान्यम्‌मधून तलावाशिवाय त्यातून निघणाऱ्या कालव्यांच्या दुरुस्तीसाठी खर्च केला जाई. पालपासून कालव्यापर्यंत वृक्ष लावले जात आणि संपूर्ण वर्षभर त्यांचा सांभाळ करणे, कापणे, छाटणे हे काम चालत असे हा सर्व खर्च मानल मान्यम्‌मधून पूर्ण केला जात असे.

खुलगा मान्यम्‌ आणि पाटुल मान्यम्‌ दुरुस्तीसमवेत त्या क्षेत्रात होणाऱ्या नवीन तलावाच्या खोदकामांवर होणारा खर्चही सांभाळीत असत. एका तलावाशी जोडलेली इतक्या प्रकारची कामे आणि इतक्या सेवा वर्षभर नियमित चालू राहाव्या, हे पाहणेसुद्धा एक कामच होते. कोणत्या कामाकरिता किती लोकांना लावावयाचे, कुठून किती लोक कमी करावयाचे याचे संयोजन करैमान्यम्‌मधून पूर्ण केले जात असे. यालाच कुलम वेट्टु अथवा कण्मोई वेट्टु असे म्हणत.

दक्षिणेतील हे छोटेसे आणि साधारण वर्णन, तलाव आणि त्याच्या संपूर्ण व्यवस्थेचा संपूर्ण तपशील देऊ शकत नाही. ते तर अथांग आहे. याच प्रकारची किंवा यालाच मिळतीजुळती व्यवस्था देशाच्या सर्व भागांत उत्तरेस, पूर्वेस व पश्चिमेससुद्धा असेल. परंतु पारतंत्र्याच्या काळात काही व्यवस्था नष्ट झाल्या तर काही स्वातंत्र्याच्या या काळातील फुटलेल्या समाजात हरवून गेल्या.

मात्र गैंगजी कल्लासारखे लोक या तुटक्याफुटक्या समाजातील विखुरलेल्या व्यवस्थांना आपल्या परीने दुरुस्त करीत आले आहेत. नाव तर गंगाजी होते, पण नंतर ते गैंगजी कसे झाले कोण जाणे! कदाचित स्नेह आणि आत्मीयतेमुळे नाव बिघडले असेल, परंतु त्यांच्या शहराला वेढा घालून उभ्या असणाऱ्या आठ भव्य तलावांची व्यवस्था तुटल्यानंतर हळूहळू आलेल्या उपेक्षेमुळे तलावांचे स्वरूप फारच बिघडले होते. वेगवेगळ्या पिढ्यांनी वेगवेगळ्या काळी हे तलाव तयार केले होते. या आठांपैकी सहांची एक साखळी होती. त्यांच्या देखरेखीची व्यवस्था सुद्धा त्या पिढ्यांनी अशीच शृंखलाबद्ध पद्धतीनेच केली असणार. पण साखळीची कडी तुटली.

ही साखळीची कडी तुटण्याचा आवाज गैंगजीच्या कानांत केव्हा पडला कोण जाणे, परंतु आज जे वयोवृद्ध फलौदी शहरात आहेत त्यांना गैंगजीचे एकच रूप आठवते. तुटकी चप्पल घालून गैंगजी सकाळपासून संध्याकाळपर्यंत या तलावांवर चक्कर मारीत. स्नानाकरिता असणाऱ्या घाटावर, पाणी घेण्यासाठी असलेल्या घाटावर कुणी घाण करताना आढळले तर बापासारखे त्याला रागे भरत.

कधी ते पालचे तर कधी नेष्टाचे निरीक्षण करीत. कोणत्या तलावाचा कोणता भाग दुरुस्त करणे आवश्यक आहे, दुरुस्ती कशी करावी याची यादी मनातल्या मनात करीत. या तलावावर येणाऱ्याजाणाऱ्या मुलांसमवेत स्वतः खेळत आणि त्यांना वेगवेगळे खेळ शिकवीत. शहराला तीन बाजूंनी वेढणाऱ्या तलावांची चक्कर पूर्ण करण्यास जवळजवळ ३ तास लागत. गैंगजी कधी पहिल्या तलावावर दिसत तर कधी शेवटच्या, कधी सकाळी इथे भेटत, तर दुपारी तिथं. संध्याकाळी कुठे भेटतील सांगता येत नसे. गैंगजी तलावाचे राखणदार आपोआप झाले होते.

वर्षाच्या शेवटी एक वेळ अशी येत असे, जेव्हा गैंगजी तलावाऐवजी गल्लीगल्लीत फिरताना दिसत. सोबत असे मुलांची फौज, प्रत्येक घराचे दार उघडताच न मागता त्यांना एक रुपया मिळत असे. अनेक वर्षांपासून प्रत्येक घरास माहीत होते की, गैंगजी फक्त एकच रुपया मागतात. कमी नाही अन् जास्तही नाही. रुपये गोळा करण्याचे काम पूर्ण होताच शहरातील सर्व मुलांना गोळा करीत. मुलांसमवेत भरपूर टोपली, फावडी, कुदळी पण जमा होत. एकामागून एक तलाव साफ होत असे. गाळ काढून पाळूच्यावर टाकला जाई. प्रत्येक तलावाच्या सांडव्यातील कचरा याच प्रकारे साफ केला जाई. एक तगाडी मातीच्या बदल्यात प्रत्येक मुलाला दोन आणे बक्षीस मिळत असे.

गैंगजी कल्ला केव्हापासून हे करीत होते, आज कुणालाही आठवत नाही. बस, इतकेच आठवते की सन ५५-५६ पर्यंत हे काम चालत होते. नंतर गैंगजी गेले.


इतर कुणाला मृत्यू झाल्याचे शहराला आठवत नाही. मात्र संपूर्ण शहर गैंगजीच्या अंत्ययात्रेत सामील झाले होते. एका तलावाच्या खाली बांधलेल्या घाटावर त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. नंतर त्याच ठिकाणी त्यांची समाधी बांधण्यात आली.

जे तलाव बनवीत त्यांना समाज संत बनवीत असे. गैंगजींनी तलाव बनविला नव्हता. पूर्वी बनविण्यात आलेल्या तलावांचे त्यांनी केवळ रक्षण केले. तरीही ते संत झाले.

फलौदीमध्ये तलावांच्या स्वच्छतेचा खेळ संत खेळवीत होते तर जैसलमेरमध्ये हा खेळ राजा स्वतः खेळत असे.

सर्वांना आधीच माहीत असे तरीही शहरात दवंडी पिटविण्यात येई. राजातर्फे वर्षाच्या शेवटच्या दिवशी फाल्गुन कृष्ण चतुर्दशीला शहरातील सर्वात मोठ्या घडसीसर तलावावर ल्हास खेळण्याचे आमंत्रण सर्वांना देण्यात येत असे. त्या दिवशी राजा व त्याचा सर्व परिवार, दरबार, सेना आणि सारी प्रजा कुदळी, फावडी, टोपली घेऊन घडसीसर वर जमा होत असे. राजा तलावातली माती खोदून पहिले टोपले भरत असे व स्वतः पाळूवर नेऊन टाकत असे, आणि वाद्यांच्या गजरात या प्रकारे ल्हास हा खेळ सुरू होत असे. संपूर्ण प्रजेच्या खाण्यापिण्याची व्यवस्था दरबारातर्फे होत असे. राजा आणि प्रजा सर्वांचे हात मातीने माखून जात.

या खेळात राजा इतका तन्मय होत असे की त्या दिवशी त्याच्या खांद्याला कुणीही खांदा लाऊ शकत असे, राजाची सुरक्षा व्यवस्था करणारे अंगरक्षकसुद्धा या दिवशी माती खोदत व माती टाकत असत.




अशाच एका ल्हास खेळाच्या वेळी जैसलमेरच्या राजा तेजसिंहवर हल्ला करण्यात आला होता. पाळूवरच त्यांना ठार मारण्यात आले. तरीही ल्हास खेळणे मात्र बंद झाले नाही. हे चालत राहिले. पसरत राहिले. मध्यप्रदेशमधील भील समाजातही ल्हास खेळला जातो. गुजरातमध्येसुद्धा. तिथे ही परंपरा तलावाच्या पुढे जाऊन समाजातील अशा सर्व कामांशी जोडली गेली होती, की ज्यात सगळ्यांची मदत हवी असे.

सर्वांसाठी सर्वांची मदत याच परंपरेतून तलाव बनत असत. यातूनच त्यांची देखभाल होत असे. माती कापली जाई, माती टाकली जाई. समाजाचा खेळ ल्हासच्या उल्हासातून चालत असे.

❖❖❖



# सहस्त्रनाम




जीवनाला पाण्याचा बुडबुडा मानणारे लोक या संसाराला एक विशाल सागर मानीत आले. अनेक पिढ्या आल्या आणि गेल्या, युगे आली नि गेली, अगदी लाटा येतात तशी. जीवन आणि मृत्यूच्या लाटांनी लहरणारा डोलणारा हा भवसागर पार करण्याचे लक्ष्य ठेवणाऱ्या या समाजाने वेगवेगळ्या प्रकारचे तलाव तयार केले आणि अत्यंत रुची घेऊन त्यांचे नामकरण केले. कधी ही नावे तलावांच्या गुणानुसार, स्वभावानुसार तर कधी विशेष घटनेच्या आधारे ठेवली जात. इतकी नावे आणि इतके प्रकार की नामकरण करताना भाषेचा शब्दकोश कमी पडला तर बोली भाषेतून शब्द उसना घेतला जाई, तर कधी संस्कृतपर्यंत नावाचा शोध जात असे.

सागर, सरोवर आणि सर ही नावे चारही दिशांना मिळतील. कधी प्रेमाने सागराचे सगरा झाले आहे. आणि बहुधा मोठा तलाव या अर्थाने या शब्दाचा वापर होत असे. सरोवर शब्द कुठे सरवर पण झालाय. संस्कृत शब्द सरसपासून सर बनलाय. मोठ्या आणि छोट्या आकारांच्या तलावांच्या नावांसाठी, पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी शब्दांच्या पुढील जोड्या वापरात होत्या. जोहड-जोहडी, बंध-बंधिचा, ताल-तलैया, पोखर-पोखरी. या जोड्या मुख्यतः राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, बंगालमध्ये जागजागी एवढेच नव्हे तर सीमापार नेपाळमध्येही आढळतात.

पोखर शब्द संस्कृतमधील पुष्करशी मिळतो. इतर ठिकाणी गावोगावी पोखर होते, मात्र बंगालमध्ये तर घरोघरी पोखर असत. घरोघरी परसदारी छोटे-छोटे, उथळ पोखर मासळी पाळण्यासाठी उपयोगात आणले जात. तिथे तलावासाठी पुष्करणी शब्दसुद्धा प्रचलित होता. पुष्करच्या नंतर आदर व श्रद्धासूचक 'जी' असा शब्द लावल्यामुळे ते सामान्य पोखर न राहता एक अति विशिष्ट तलाव बनतो. राजस्थानमधील अजमेरजवळ पुष्करजी नावाचे प्रसिद्ध तीर्थ आहे. येथे ब्रह्माजीचे मंदिर आहे.

सर्वात अधिक प्रचलित नाव आहे तालाब. परंतु तलावाचे नामकरण करताना या शब्दांचा उपयोग कमीच आढळतो. डिग्गी हे नाव हरियाणा, पंजाब आणि दिल्लीत प्रचलित होते. पाणी साठवण्याच्या छोट्या हौदापासून मोठ्या तलावापर्यंत डिग्गी हे नाव आढळते. कधी काळी दिल्लीतील लाल किल्ल्याच्या अगदी समोर लाल डिग्गी नावाचा एक मोठा तलाव होता. अंबालामध्ये आजही डिग्गी या नावाचे अनेक तलाव आहेत. डिग्गी शब्द दीघी आणि दीर्घिका सारख्या संस्कृत शब्दांतून आला आहे.



कुंड पण हौदासारखाच छोटा आणि पक्का प्रकार आहे. परंतु काही ठिकाणी तलावांनासुद्धा कुंड अथवा हौद असे नाव आढळते. मध्य प्रदेशमधील खंडवा शहरात कुंड नावाने ओळखले जाणारे अनेक तलाव आहेत. हौजचे उदाहरण दिल्लीचा हौजखास आहे. पण आज तलावाच्या ऐवजी एका मोहल्ल्याच्या रूपातच तो ओळखला जातो.

ताल बऱ्याच ठिकाणी आहे. परंतु याच्याशी मिळताजुळता शब्द चाल हा शब्द एका क्षेत्रातच सीमित झाला आहे. हे क्षेत्र आहे उत्तर प्रदेशातील हिमालयाचे. या पहाडी जिल्ह्यात कधी काळी गावागावांत चाल असत. मैदानी गावात किंवा शहरात ताल नागरी वस्तीमध्ये किंवा वस्तीच्या जवळच असत, पण डोंगराळ भागात चाल वस्तीपासून थोड्या अंतरावर आणि उंचावर असत. चालांचा उपयोग थेट पेयजलासाठी होत नसे. पण याच चालांमुळे गावातील पाण्याचे झरे वर्षभर वाहत असत. पहाडात होणाऱ्या पहिल्या जोरदार पावसाचा वेग झेलणे, अचानक येणाऱ्या पुरास प्रतिबंध करणे आणि वर्षभर झऱ्यांना पाणी मिळणे याकरिता चाल बांधण्याची प्रथा इतकी होती की प्रत्येक गावात वरच्या बाजूस पहाडामध्ये ३० ते ४० चाल आढळत.

चाल साधारण ३० पावले लांब, तितकीच रुंदी व ४-५ हात खोल असे. गावातील सर्वांनाच याचे बांधकाम करता येत असे आणि यांच्या साफसफाईत सर्वजण भाग घेत. हे चाल पाण्याचा निचरा करण्याच्या कामात येत असत. तसेच गावातील जनावरे आणि वन्य पशू यांच्यासाठीही पाणी उपलब्ध करून देण्याच्या कामी उपयुक्त असत.


हिमालयात चालला कुठे खाल, कुठे तोली, तर काही ठिकाणी चौरा असेही म्हणतात. आजूबाजूची गावे यांच्याच नावाने ओळखली जातात. जसे उपरेखाल, रानी चौरा आणि दुधातोली. थेट उत्तरेतील हे शब्द खाली दक्षिणेतही आले आहेत. केरळ आणि आंध्र प्रदेशमधील चैर आणि चेरुवू शब्द तलावाच्या अर्थानेच वापरलेले आढळतात.

पक्क्या चौकोनी घाटांनी वेढलेल्या तलावास चोपरा किंवा चौपरा आणि 'र' चा 'ड' होऊन चौपडा असेही म्हटले गेले. उज्जैनसारख्या प्राचीन शहरात, झांसीसारख्या ऐतिहासिक शहरात तसेच चिरगावसारख्या साहित्यिक स्थानातसुद्धा चौपडा आहे.

चौपराशी मिळतेजुळते नाव आहे चौधरा. चारी बाजूंनी चांगल्या व पक्क्या घाटांनी वेढलेल्या तलावास चौधरा म्हणतात. याचप्रकारे तिघरा पण आहे. यामध्ये पाणलोट क्षेत्राला लागून असणारी एक बाजू, बहुधा कच्ची सोडीत असत. चार घाट आणि तीन घाट पुढे जाऊन अठघट्टी पोखरसुद्धा होत. म्हणजे आठ घाट असणारे. वेगवेगळ्या घाटांचा उपयोग वेगवेगळा होत असे. काही ठिकाणी वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळे तलाव बनत असत तर काही ठिकाणी एकाच मोठ्या तलावावर वेगवेगळ्या जातींकरिता वेगवेगळे घाट बनवीत असत.

यामध्ये स्त्रिया आणि पुरुषांच्या स्नानासाठीसुद्धा स्वतंत्र व्यवस्था असे. छत्तीसगढमध्ये डौकी घाट महिलांसाठी तर डौका घाट पुरुषांकरिता बनवीत असत. कुठे गणेशाची तर कुठे दुर्गामातेची मूर्ती असे, तर कुठे ताजिए. सर्वांचे घाट मात्र वेगळे. याप्रकारे तलावास आठ घाट बनत आणि ते अठघट्टी म्हणविले जात.

अठघट्टी ताल दूरवरूनच चमकत पण गुहिया पोखर तिथे पोहचल्यानंतरच नजरेस पडत. गुहिया म्हणजे गुह्य, लपलेले पोखर. आकारात हे लहान असत आणि बहुतांशी पावसाचे पाणी जमा होऊन आपोआप बनत. बिहारमध्ये दोन गावांमधील निर्जन क्षेत्रात आजही गुहिया पोखर आढळतात.



आपोआप तयार झालेल्या या तलावांचे आणखी एक नाव आहे अमहाताल. छत्तीसगढमध्ये अमहाचा अर्थ आहे अनायास. गावांना लागून दाट वनात नैसर्गिक रूपाने सखल भागात पाणी जमा होते. जनावरांना घेऊन इकडेतिकडे जाताना असे तलाव अनायासेच मिळतात. त्या रस्त्यांनी नेहमी ये-जा करणारे लोक अशा तलावांना थोडी दुरुस्ती करतात आणि त्यांना उपयोगात आणतात.

अमहाचा एक अर्थ अंबा असाही आहे. अंबावृक्षाने, आमराईने वेढलेल्या तलावास अमहा तरिया, ताल अथवा आमा तरिया म्हणतात. याच प्रकारे अमरोहा आहे. आज हे एका शहराचे नाव आहे, परंतु कोणे एके काळी अंबावृक्षांनी वेढलेला हा एक तलाव होता. काही ठिकाणी अशा तलावांना अमराहसुद्धा म्हणत. जसे अमराह तसेच पिपराह. संपूर्ण पाळूवर पिंपळाचे भव्य वृक्ष. अमराह आणि पिपराहमध्ये पाळूवर किंवा खाली कितीही वृक्ष असोत ते मोजता येत. परंतु लखपेडाताल, लक्षावधी वृक्षांनी घेरलेला असे. इथे लाखचा अर्थ अगणित असा आहे. काही ठिकाणी अशा तलावांना लखरावसुद्धा म्हणत.

लखरावलाही मागे टाकेल असा होता भोपालताल. याच्या विशालतेवरून हिंदीत एक म्हण आहे. ''ताल तो भोपालताल बाकी सब तलैया.'' अकराव्या शतकात राजा भोजने बनविलेला हा तलाव ३६५ नाले आणि नद्यांतून भरत असे आणि ६५० वर्ग कि.मी. इतका त्याचा जलपसारा होता. माळव्याचा सुलतान होशंगशाह याने १५ व्या शतकात हा तलाव युद्धाच्या कारणावरून तोडला. पण हे कामसुद्धा युद्धापेक्षा काही कमी नव्हते. हा तलाव तोडण्यासाठी त्याला खूप मोठ्ठी फ़ौज पाठवावी लागली.

एवढ्या प्रचंड फौजेसही तो तोडण्यास ३ महिने लागले आणि नंतर तीन वर्षे त्यातील पाणी वाहत होते तेव्हा कुठे त्याचा तळ नजरेत आला. परंतु याच्या आगराची दलदल ३० वर्षेपर्यंत कायम होती. तळ कोरडा पडल्यानंतर यात शेती करण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून आजपर्यंत यात उच्च प्रतीच्या गव्हाचे उत्पन्न होत आहे. मोठ्यांच्या गोष्टी सोडून छोट्या तलावाकडे येऊ. कमी खोल आणि लहान आकारांच्या तलावांना चिखलिया म्हणत. हे नाव चिखल या शब्दापासून बनले. अशा तलावाचे एक जुने नाव डाबर असेही होते. डाबरचे नंतर डबरा झाले. अशाच छोट्या तलावांना बाई किंवा बायसुद्धा म्हणत. दिल्लीत कुतुबमिनारजवळ राजोकी बाय नावाची विहीर आज या शब्दाप्रमाणेच जुनी झाली आहे.

जुन्या झालेल्या नावात निवाण, हद, कासार, तडाग, ताम्रपर्णी, ताली, तल्ल इ. आहेत. यात तल्ल हे एक असे नाव आहे जे काळाच्या दीर्घ ओघात बंगाल व बिहारमध्ये अजूनही आढळते. याच प्रकारे जुने होऊन बुडालेले जलाशय हे नाव सरकारी हिंदी आणि सिंचन विभागात पुन्हा वापरात आले आहे. अनेक जागी अत्यंत जुन्या तलावांची नावे, समाजास आठवणीत ठेवण्यालायक न वाटल्याने लोप पावून त्यांना पुन्हा नवीन नावे मिळत.

पुरनैहा म्हणजे बराच जुना तलाव. आसपासच्या तलावांच्या मोजणीत सर्वात शेवटी बनलेला असे नौताल, म्हणजेच नवीन तलाव. ते जुने झाले तरी याच नावाने ओळखले जात. काठापासूनच खोल होत जाणाऱ्या परंतु लहान असणाऱ्या तलावास गुचकुलिया असे म्हणत. पल्वल पण अशाच खोल तलावाचे जुने नाव आहे. काळाच्या ओघात ही नावेही मागे पडली.

आज त्याची आठवण दिल्लीतील एक वस्ती आणि स्टेशन पलवलच्या रूपाने मागे आहे, ज्यावर न थांबताच रेल्वेगाड्या पळत असतात. ज्यांचे पाणी अत्यंत स्वच्छ राहते आणि पिण्यासाठी उपयोगी पडते अशा तलावांना छत्तीसगढमध्ये खदुअन असे म्हणत. पनखत्ती तलाव केवळ निस्सारण्याच्या कामी येत. याच प्रकारे लेंड्यातालं आणि खुरताल निस्तारी, यांचा उपयोग बहिर्दिशेसाठी आणि जनावरांना पाणी पाजविण्यासाठी होत असे.

वेगवेगळ्या स्वतंत्र रूपात बनलेल्या तलावांशिवाय काही ठिकाणी एक दुसऱ्यास जोडणाऱ्या तलावांची साखळी बनविली जात असे. एकाचे अतिरिक्त पाणी दुसऱ्यात, दुसऱ्याचे तिसऱ्यात..... ही पद्धत राजस्थान व आंध्रच्या रायलसीमा अशा कमी पावसाच्या क्षेत्रात, सरासरी पर्जन्यमान बरे असणाऱ्या बुंदेलखंड आणि माळवा भागात तसेच भरपूर पावसाच्या गोवा आणि कोकण इं. विभागात समानरूपाने आढळते. उत्तरेत या पद्धतीस सांकल किंवा सांखलताल पद्धती असे म्हणतात, तर दक्षिणेत दशफला पद्धती असें म्हणतात.

**देखभाल दुरुस्ती चांगली असणाऱ्या कालखंडात सुद्धा कधी कधी काही विशेष कारणामुळे एखादा तलाव समाजास अनुपयोगी होत असे. अशा तलावांना हातीताल असे म्हणत. हाती शब्द संस्कृतमधील हत शब्दापासून बनलाय आणि याचा अर्थ नष्ट होणे असा आहे. 'हत तेरे की' या वाक्यातसुद्धा 'हत तुझ्या भाग्याची', म्हणजेच तुझे भाग्य नष्ट होऊ दे असाच याचा अर्थ आहे.**

तलावांची ही साखळी ढोबळमानाने दोन ते दहा तलावांची असू शकते. साखळी दोनच तलावांची असून दुसरा तलाव पहिल्यापेक्षा खूपच छोटा असेल तर त्यास छिपीलाई असे म्हणत. म्हणजेच पहिल्या मोठ्या तालच्या मागे लपलेली तलाई.

मात्र जो तलाव समोर आहे आणि सुंदरसुद्धा, त्याचे नाव काहीही असो, त्याला सगुरीतालसुद्धा म्हणत. ज्या तलावात मगरी असत, त्या तलावाला एखाद्या मोठ्या राजाचे नाव दिलेले असले तरीही, लोकांनी सावध राहावे म्हणून, त्याचे नाव मकराताल, नकया किंवा नकराताल असे ठेवत. नकरा शब्द संस्कृतमधील नक्र म्हणजे मगरपासून तयार झाला. काही ठिकाणी गधयाताल असेही आढळते. गाढव ओझे वाहण्याचे काम करते. जाड दोरीचे जेवढे ओझे एक गाढव उचलू शकेल तितक्या लांबीच्या दोरीएवढ्या खोल असणाऱ्या तलावास गधयाताल असे म्हणत. कधी कधी एखाद्या घटनेमुळे किंवा दुर्घटनेमुळे तलावाचे जुने नाव बदलूनच जाते.

कुठे कुठे ब्रह्मनमारताल आढळतात. याचे मूळ नाव काही वेगळे असावे, परंतु कधी काळी त्या तलावात कुण्या ब्राह्मणाचा घात झाला असेल आणि त्यानंतर त्या तलावाचे ब्रह्मणमारा हेच नाव पडले असेल. याच प्रकारे एक नाव आहे बैरागीताल. याच्या पाळूवर बसून कुणी संन्यासी झाले असेल. नदीच्या किनाऱ्यावर नद्याताल आढळतात. असे तलाव आपल्या पाणलोट क्षेत्रातून नव्हे तर नदीला आलेल्या पुरामुळे भरत असत. नदीऐवजी जमिनीखालच्या पाण्यामुळे भरणाऱ्या तलावाला भूफोडताल म्हटले जाई. जमिनीखालच्या पाण्याची पातळी उंच असलेल्या ठिकाणी असे तलाव जास्त करून आढळतात. अद्यापही उत्तर बिहारमध्ये असे काही तलाव आहेत आणि काही नव्यानेही बांधले गेले आहेत.

देखभाल दुरुस्ती चांगली असणाऱ्या कालखंडातसुद्धा कधीकधी काही विशेष कारणामुळे एखादा तलाव समाजास अनुपयोगी होत असे. अशा तलावांना हातीताल असे म्हणत. हाती शब्द संस्कृतमधील हत शब्दापासून बनलाय, आणि याचा अर्थ नष्ट होणे असा आहे. 'हत तेरे की' या वाक्यातसुद्धा 'हत तुझ्या भाग्याची', म्हणजेच, तुझे भाग्य नष्ट होवो, असाच याचा अर्थ आहे. हतप्रभ, हत-आशा पण याच प्रकारे बनलेत. याचप्रकारे हातीताल अनुपयोगी तलावासाठी वापरण्यात येणारे नवीन नाव होते. परंतु हाथीताल यापेक्षा एकदम वेगळे नाव आहे. - असा तलाव ज्याची खोली हत्तीइतकी आहे. परत हातीतालकडे जाऊ. हे नाव संस्कृतपासून लांबची यात्रा करून आल्याने थकलेले दिसले, तर साध्या बोलीभाषेत नवीन ताजे नाव येते.

फुटाताल, फुटेरातालसुद्धा अनेक भागांत आढळतील. ज्या तलावावर कधी लग्नाच्या वऱ्हाडी मंडळीस जानोसा दिला आहे, गावातील दहा बारा लग्नांच्या वराती जेथे कधी काळी थांबल्या आहेत, त्या तलावाचे नाव बराती ताल पडत असे. मात्र मिथिला (बिहार)चा दुलहाताल एक विशेष तलाव आहे. मिथिला हे सीतेचे माहेर आहे. तिच्या स्वयंवराच्या स्मृतीमध्ये आजसुद्धा इथे स्वयंवरे होतात. फरक एवढाच आहे की वराची निवड वधू नव्हे तर वधूपक्ष करतो.

दुल्हातालवर एका ठराविक दिवशी मुलाकडचे लोक आपल्या मुलांना घेऊन जमा होतात. त्यानंतर कन्यापक्ष त्यातून आपल्या कन्येसाठी योग्य वराची निवड करतात. छत्तीसगढमध्ये सुद्धा असे काही तलाव आहेत ज्यांचे नाव दुलहराताल आहे. अनेक तलावांची नावे कथेतून आली आहेत. बराच काळ या तलावांनी समाजसेवा केली आहे आणि लोकांनीही तलावांच्या कथांना बराच काळ जशाच्या तशा आठवणीत ठेवल्या आहेत. अशा तलावांमध्ये एका तलावाचे 'हा हा पंचकुमारीताल' असे अगदी विचित्र नाव आहे.

बिहारमधील मुंगेरजवळ एका उंच डोंगराच्या पायथ्याशी हा तलाव आहे. त्याची कथा अशी आहे की एक राजा होता, त्याला पाच मुली होत्या. काही कारणाने या मुली उंच डोंगरावरून उडी मारून तलावात बुडून प्राण देतात.